ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

# प्रौढ अध्ययनार्थींची मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये व त्यांच्या अध्ययन-अध्यापनात मार्गदर्शकांची भूमिका

* डॉ. शशिकांत श्रीधर अन्नदाते,

* सहायक प्राध्यापक, बी.ए.बी.एड. विभाग, महावीर महाविद्यालय, कोल्हापूर

अध्ययन म्हणजे स्वत:च्या मुळ वर्तनाला अनुभवांद्वारे बदलवणे होय. प्रौढांच्या मूळ सवयी आणि वर्तनामध्ये नवे अनुभव, माहिती, ज्ञान व कौशल्ये संपादनामुळे प्रागतिक बदल घडवून आणणे म्हणजे प्रौढांची शिक्षण प्रक्रिया होय. प्रौढ शिक्षणात प्रौढ नवनवे अनुभव घेतात, त्यांच्या शिकण्याची प्रक्रिया आयुष्यभर सुरु असते, मात्र हे करत असतांना त्यांचे मानसशास्त्र समजून घेणे आवश्यक आहे, तरच त्यांची अध्ययन व अध्यापन प्रभावी होऊ शकते.

**Copyright © 2022 The Author(s):** This is an open-access article distributed under the terms of the Creative Commons Attribution 4.0 International License (CC BY-NC 4.0) which permits unrestricted use, distribution, and reproduction in any medium for non-commercial Use Provided the Original Author and Source Are Credited.

प्रौढांच्या अध्ययन व अध्यापन प्रक्रिया सहज, सुलभ व सुकर होण्यासाठी प्रौढांच्या मानसशास्त्राचा अभ्यास करणे आवश्यक आहे. प्रौढांचे मानसशास्त्र समजून घेतल्यानेच प्रौढ शिक्षणाचा अभ्यासक्रम, अध्यापन पद्धती, अध्ययन-अध्यापन साहित्य, मूल्यमापन यांचे नियोजन करणे शक्य होते. यासंदर्भात मानसशास्त्रज्ञांनी विविध प्रयोग करून प्रौढांची अध्ययन प्रक्रिया समजावून घेतल्या आहेत.

मानसशास्त्रीय संशोधनाद्वारे बालक व प्रौढ यांच्यातील मानसशास्त्रीय फरक स्पष्ट झाला आहे. बालकाच्या बुद्धीमत्तेची वाढ साधारणपणे पंधरा वर्षापर्यंत होत असते, त्यांची स्मरणशक्ती व कल्पनाशक्ती प्रभावी असते तर प्रौढांच्या बुद्धिमत्तेत वाढ होत नाही पण त्यांचा अनुभवातून विकास होतो. प्रौढांची आकलनशक्ती अधिक प्रभावी असते व त्यांना वास्तव प्रसंगाचे अध्ययन अधिक आवडते.

साधारणपणे बालकाच्या शिक्षणाची जबाबदारी आई-वडील घेतात, मात्र प्रौढ कुटुंबांच्या उदरनिर्वाहासाठी कार्य करून शिकत असतात. बालकाच्या आंनद व दु:ख, मान व अपमान या भावना प्रभावी नसतात मात्र याच भावना प्रौढात उत्कटतेने आढळून येतांना दिसतात. बालकांमध्ये मनोभावनांचा पगडा अल्पकाळ तर प्रौढांमध्ये मनोभावनांचा पगडा दीर्घकाळ असल्याचे दिसून येते. बालकांना त्यांच्या शिक्षणासाठी आई, वडील, शिक्षक यांचे सदोदित मार्गदर्शन असते मात्र प्रौढांच्या बाबतीत त्यांना असे मार्गदर्शन फारसे मिळत नसते, त्यामुळे त्यांच्यात शिकण्याची प्रेरणा निर्माण करण्याची विशेष गरज भासत असते. बालक व प्रौढ यांच्यातील अध्ययन प्रक्रीयेसंदर्भातील हे फरक लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर शोधनिबंधात प्रौढ शिक्षणाची संकल्पना, प्रौढ शिक्षणाची गरज व महत्व आणि प्रौढ अध्ययनार्थींची मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये स्पष्ट करण्यात

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

आली आहेत.

**प्रौढ शिक्षणाची संकल्पना:**

प्रौढांना केवळ लिहिता-वाचता येणे अशी प्रौढ शिक्षणाची संकुचित संकल्पना नाही. प्रौढांना साक्षरतेच्या माध्यमातून सामाजिक, आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी करणे तसेच प्रौढांमध्ये जीवनोपयोगी कौशल्यांचा विकास करणे, त्यांच्यात नागरिकत्वाची भावना रुजवणे अशी प्रौढ शिक्षणाची व्यापक संकल्पना आहे.

१. "प्रौढ शिक्षण म्हणजे जाणीवजागृती, कार्यात्मकता व साक्षरता यांचा परिपोष करणे होय."

२. "प्रौढ शिक्षणासाठी १५ ते ३५ हा कार्यशील लक्ष्यगट मानला जातो व या वयोगटातील जे लोक निरक्षर असतात, त्यांच्यासाठी प्रौढ शिक्षण असते. प्रौढ शिक्षण हा अनौपचारिक शिक्षणाचा एक भाग आहे."

३. प्रौढ शिक्षणाच्या संकल्पनेत पुढील तीन बाबींचा समावेश होतो.

   १. **जाणीवजागृती** – यामध्ये कौटुंबिक व सामाजिक जीवनातील जबाबदारी, लोकांचे हक्क, समाजाच्या विकासासाठी त्यांची भूमिका यांची जाणीव प्रौढांमध्ये विकसित करणे अपेक्षित आहे.

   २. **कार्यात्मकता** – जे लोक काम करून उपजीविका करतात त्यांच्यात कार्यानुरूप कौशल्ये विकसित करणे, योग्य सवयी विकसित करणे, आर्थिक उत्पन्नाचे स्त्रोत प्रौढांमध्ये निर्माण करण्याची क्षमता विकसित करणे यामध्ये अपेक्षित आहे.

   ३. **साक्षरता** – यामध्ये वाचन, लेखन व प्राथमिक अंकगणित यांची ओळख करून देणे अपेक्षित आहे.

**प्रौढ शिक्षणाची गरज व महत्व:**

कोणत्याही देशाची प्रगती मानव संसाधनाचा देशाच्या विकासासाठी किती परिणामकारक वापर केला जातो, यावर अवलंबून असते. त्यादृष्टीने प्रौढ शिक्षण कार्यक्रमाचे गरज व महत्व पुढीलप्रमाणे विशद करता येईल.

१. ज्यांना काही कारणाने औपचारिक शिक्षण घेता आले नाही, त्यांना निरंतर शिक्षणाच्या माध्यमातून साक्षर करता येते. याद्वारे त्यांच्यात लेखन व वाचनाचे कौशल्य विकसित केले जाते.

२. राष्ट्रीय विकासात प्रौढांच्या सहभाग वाढवता येतो व त्याद्वारे समाज गतीशिल व प्रगतीशील बनवता येतो.

३. वाढत्या लोकसंख्येला आळा घालण्यासाठी व प्रौढांमध्ये वैज्ञानिक दृष्टीकोन रुजविण्यासाठी प्रौढ शिक्षण उपयुक्त ठरते.

४. प्रौढ शिक्षणाद्वारे प्रौढांमध्ये वैयक्तिक जीवनासाठी आरोग्यदायी सवयींचे विकसन करता येते. तसेच त्यांच्या उपजीविकेस अनुसरून व्यावसायिक कौशल्यांचा विकास करता येतो, त्यातून प्रौढ आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी बनतात.

५. त्याचप्रमाणे प्रौढांमध्ये अज्ञान, अंधश्रद्धा यांचे निर्मुलन करून त्यांना ज्ञानाद्वारे सक्षम करण्यासाठी प्रौढ शिक्षण आवश्यक

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

ठरते.

**प्रौढ अध्ययनार्थींची मानसशास्त्रीय गुणवैशिष्ट्ये:**

प्रौढ अध्ययनार्थींची मानसशास्त्रीय गुणवैशिष्ट्ये व त्याबाबत मार्गदर्शकांची भूमिका याचे विवेचन पुढीलप्रमाणे आहेत.

**१. प्रौढ अध्ययनार्थींच्या भावना:**

प्रौढ अध्ययनार्थींची प्रगल्भता, तीव्रता व त्यांच्या 'अहंम'पणाचा अध्ययनावर परिणाम होत असतो. काही प्रौढ अध्ययनार्थी ज्ञान व कौशल्ये संपादनाबाबत साशंक असतात, त्यांना शिकण्याचा तिटकारा वाटत असतो. बालकांप्रमाणे ते स्तुतीने हुरळून जात नाहीत तसेच त्यांच्याबद्दल अनुद्गार काढले गेलेत तर ते लगेचच चिडत असल्याचे दिसते.

या मानसशास्त्रीय बाबी लक्षात घेऊन प्रौढांना अध्यापन करतांना त्यांच्यात आत्मविश्वास निर्माण करण्याचा प्रयत्न समंत्रक, शिक्षक यांनी केला पाहिजे. प्रौढांच्या अध्ययनातील प्रगतीचे कौतुक केल्यास त्यांच्यात पुढील अध्ययन करण्याची आवड निर्माण करता येते. त्यासाठी अध्ययन अध्यापन क्रियेत शाब्बास, छान, अरे व्वा, खूपच चांगली प्रगती असे उत्साह निर्माण करणाऱ्या प्रबलनपर शब्दांचा वापर करावा.

**२. प्रौढांच्या महत्वकांक्षा:**

प्रौढांमध्ये शिक्षणाच्या माध्यमातून आपले समाजातील, समवयस्कातील व कामाच्या ठिकाणी आपले स्थान उंचावण्याची महत्वकांक्षा असते. त्यांना शिक्षणाच्या माध्यमातून आपली व्यावसायिक कौशल्ये वृद्धिंगत व्हावी व त्यातून आपला आर्थिक फायदा व्हावा अशी त्यांची महत्वकांक्षा असते.

या मानसशास्त्रीय बाबी लक्षात घेऊन शिक्षकांनी त्यांची बुद्धिमत्ता, अभिरुची यांना चालना मिळेल अशा बुद्धीमंथन, प्रकल्प, स्वाध्याय या अध्यापन पद्धतींचा वापर केला पाहिजे. प्रौढांच्या आशा-आकांक्षाची पूर्ती करणारे शिक्षण त्यांना दिल्यास ते प्रयत्नाने व नियमित शिकतात.

**३. प्रौढ व यश:**

प्रौढांना कोणतीही बाब लवकर शिकता यावे असे वाटते, कौशल्य गतीने शिकवावे असे वाटते, त्यांना रेंगाळत राहण्याची सवय आवडत नाही. त्यांना बौद्धिक आव्हान देईल अशा स्वरूपाचे यश प्राप्त करण्यास आवडते.

याबाबी लक्षात घेऊन नवनवीन अध्ययन अध्यापन पद्धतींचा वापर अध्यापनात करावा. सोप्याकडून कठीणाकडे, मूर्ताकडून अमूर्ताकडे, ज्ञाताकडून अज्ञाताकडे या मानसशास्त्रीय सूत्रांचा अध्यापनात वापर केला पाहिजे. प्रौढांच्या शिकण्याची गती, वय, अनुभव यांचा विचार करून एखादी कल्पना, पूर्ण धडा त्यांना एकाचवेळी शिकवण्यात यावा. त्वरित यश मिळविण्यासाठी आवश्यक तेवढे कष्ट करण्याची प्रौढांची तयारी असते, त्याचा उपयोग त्यांना अध्यापन करणाऱ्यांनी करून घेतला पाहिजे.

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

**४. प्रौढांची अभिरुची व दृष्टीकोन:**

प्रौढ अध्ययनार्थी हा कौटुंबिक व्याप सांभाळून शिकत असतो, त्यामुळे तो करत असलेला व्यवसाय त्याचे प्रथम प्राधान्य असते, शिक्षण हा नंतरचा प्राधान्यक्रम असतो. प्रौढांची विचारप्रक्रिया हि स्थिर झालेली असल्याने त्यांची काही ठाम मते असतात व ती बदलवण्यास ती सहसा तयार होत नाहीत. त्यांना एकट्याने शिकणे आवडत नाही तर सामुहिकपणे शिकणे आवडत असते. काही प्रौढांना आपल्या मनाप्रमाणे अध्यापन केले गेले नाही तर राग येतो. काही अध्ययनार्थींना शिकण्याचा कंटाळा येतो.

या बाबी लक्षात घेऊन त्यांना अध्यापन करणाऱ्यांनी त्यांची अभिरुची शिक्षणामध्ये जागृत होईल या पद्धतीने शिकवले पाहिजे. त्यांना अध्यापन करतांना आनंद, उमेद, उल्हास या भावनांनी युक्त अध्यापन करावे, जेणेकरून या भावनांचा प्रौढातही विकास होईल. प्रौढांचा ठाम दृष्टीकोनात बदल होण्यासाठी शिक्षकांनी संयतपणे एखाद्या घटनेचे वेगवेगळे पैलू त्यांच्या लक्षात आणून द्यावेत. अध्यापन करतांना एखादा अध्ययनार्थी चिडला तरी शिक्षकांनी स्वत: न चिडता त्याला संयमाने हाताळावे, तसेच तो का चिडला यामागील कारणे जाणून स्वत:च्या अध्ययन अध्यापनात बदल करावा.

**५. प्रौढांमधील न्यूनगंड:**

लहान बालके जिज्ञासू, कुतूहल असणारी असतात, त्यांची एखादी गोष्ट चुकली तरी ते पुन्हा प्रयत्न करतात. मात्र प्रौढांना एखादी गोष्ट मनाप्रमाणे जमली नाही तर ते लगेचच निराश होतात. काही वेळा कौटुंबिक व व्यावसायिक जबाबदारी असल्याने ते शिक्षण चांगल्या प्रकारे घेऊ शकत नाही, त्यामुळे त्यांच्यात निराशा येते. यामधून एखादे नवीन काम हाती घेतले तर त्यात आपणास अपयश येईल अशी भावना त्यांच्यात बळावत असते. यामधून त्यांच्या कार्यक्षमता, इच्छा बोथट होण्याची शक्यता असते.

अशावेळी प्रौढांना अध्यापन करणाऱ्या समंत्रक किंवा शिक्षकांनी त्यांना प्रेरणा मिळेल असे प्रसंग, घटना सांगून त्यांना प्रेरित करावे. अध्यापन करतांना प्रौढांची मानसिकता लक्षात घेऊन अध्यापन केले पाहिजे. त्यांना अध्यापन प्रक्रियेत वेळोवेळी सामावून घेऊन त्यांच्यातील न्यूनगंड दूर करून त्यांना आत्मविश्वासाने शिक्षण व कौशल्ये शिकण्यास प्रेरित केले पाहिजे.

**६. प्रौढांची परिवर्तन विषयक मानसिकता:**

प्रौढांचे जीवन स्थिरावलेले असते. त्यांना जीवनामध्ये आहे ती स्थिती बरी वाटत असते, त्यांची नवीन बदलांची मानसिकता नसते. काही प्रौढांची समाजात शिक्षण घेऊन बदल करण्याची भूमिका असते, मात्र त्यांना त्यांचे कुटुंबीय व काही समवयस्क यापासून निराशाजनक बोलून रोखत असल्याचे दिसते.

याबाबी लक्षात घेऊन शिक्षकांनी अध्यापन करतांना शिकण्यामुळे जीवनात कसे बदल झाले, प्रगती कशी झाली याची माहिती

ISSN: P-2455-0515
E- 2394-8450

Educreator Research Journal

VOLUME–IX, SPECIAL ISSUE – I NOV – DEC 2022

Original Research Article

दिल्यास त्यांची शिकण्याची उत्सुकता वाढते. बदल हा जीवनाचा नियम आहे, हे स्वीकारून मानवाने वाटचाल करत राहिल्याने आजवरची प्रगती झाली आहे, हे प्रौढांना लक्षात आणून द्यावे. प्रौढांचा आत्मविश्वास, सारासार विवेकबुद्धी अध्यापनातून जागृत केल्यास ते उज्वल भविष्यकाळ घडविण्यासाठी परिवर्तनास तयार होतात.

**७. प्रौढ व वास्तव अनुभव:**

प्रौढ व्यक्तींना जीवनाशी निगडीत नसणारे शिक्षण आवडत नाही. ज्या शिक्षणातून त्यांच्या व्यवसायाला अनुरूप कौशल्ये मिळत नाही, अशी कौशल्ये शिकणे त्यांना आवडत नाही. प्रौढ व्यक्तींना वास्तव अनुभवातून शिकणे आवडते. त्यांना त्यांचे वैयक्तिक काम सांभाळून शिक्षण घेत असल्यास काही वेळा कंटाळाही येतो.

सदर बाब लक्षात घेऊन शिक्षकांनी त्यांना जीवनाशी निगडीत अनुभव, ज्ञान-कौशल्ये विकसित करावीत. प्रौढांचे दृष्टीकोन, अभिरुची आणि महत्वकांक्षा लक्षात घेऊन त्यानुरूप आशय अभ्यासक्रमात समाविष्ट केला पाहिजे. प्रौढ व्यक्तींना अध्यापन करतांना कंटाळा येऊ नये म्हणून एक-दोन तासिकेनंतर मध्यंतर असावे.

अशा प्रकारे प्रौढ अध्ययनार्थींचे मानसशास्त्र समजावून घेऊन त्यांना मार्गदर्शन करण्याची भूमिका शिक्षक व समंत्रक यांनी ठेवल्यास अध्ययन-अध्यापन प्रक्रिया परिणामकारकरित्या घडून येईल.

**संदर्भग्रंथ सूची:**

१. पाटील, लीला.(२००२), आजचे अध्यापन, पुणे, श्री विद्या प्रकाशन
२. दांडेकर, वा.ना.(२०२१), शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, २०२१, पुणे, नरेंद्र प्रकाशन
३. जगताप, ह.ना.(२०२२), मुलभूत शैक्षणिक व प्रायोगिक मानसशास्त्र, २०२२, जळगाव, प्रशांत पब्लिकेशन्स
४. गुरव, के.एस., मथुरे, सुरेश., गुरव, अनुराधा.(२०१८), प्रौढ व निरंतर शिक्षण, नाशिक, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ
५. भोसले, रमा., डोणे, उज्वला.(२००९), शिक्षणातील बदलते विचारप्रवाह, कोल्हापूर, फडके प्रकाशन

*Cite This Article:*
* **डॉ. शशिकांत श्रीधर अन्नदाते** ***(2022).*** प्रौढ अध्ययनार्थींची मानसशास्त्रीय वैशिष्ट्ये व त्यांच्या अध्ययन-अध्यापनात मार्गदर्शकांची भूमिका, ***Educreator Research Journal, Volume–IX, Special Issue – I****, Nov –Dec 2022, 142-146.*